**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः16.03.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

- पात्र झोपडपट्टीधारकांना हक्काची घरे मिळण्यासाठी, एकही नवीन झोपडपट्टी उभारली जाता कामा नये, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांची सूचना
- रक्तदात्यांची संख्या वाढल्याने, रक्तपिशव्यांच्या संकलनात महाराष्ट्र आघाडीवर
- संत तुकाराम महाराजांच्या 375 व्या बीज सोहळ्यासाठी दुमदुमली देहू नगरी

आणि,

- विदर्भात उष्णतेच्या लाटेचा केशरी बावटा

**पीयूष गोयल**

पात्र झोपडपट्टीधारकांना हक्काची घरे मिळावीत, यासाठी एकही नवीन झोपडपट्टी उभारली जाता कामा नये, तसंच अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई केली जावी, असं केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल महात्मा फुले नगर इथल्या 91 झोपडपट्टीधारकांना सदनिकांचे वाटप करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. झोपडपट्टी पुनर्वसनाची प्रक्रिया गतीमान होण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम करावे. तसेच, बाहेरचा कोणी या भागात येणार नाही आणि इथल्या रहिवाशांना अन्यायाने बाहेर फेकले जाणार नाही, याची खबरदारी अधिकाऱ्यांनी आणि झोपडपट्टीधारकांनी घ्यावी असं गोयल यांनी सांगितलं.

**गडकरी**

औषध निर्माण शाखेच्या विद्यार्थ्यांनी, विद्वत्ता आत्मसात करण्यासोबतच उद्यमशीलतेची कास धरून नोकरी देणारे, तसेच रोजगार निर्माते व्हावं आणि विदर्भाच्या आर्थिक विकासात योगदान द्यावं असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. नागपूरच्या लोणारा इथल्या सेंट्रल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या पदवीप्रदान सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते.

**एमपीएससीमराठीतून**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एम.पी.एस.सी.च्या द्वारे घेण्यात येणाऱ्या सर्व स्पर्धा परीक्षा, मराठीतून घेण्यात येणार असल्याची घोषणा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच विधान परिषदेत केली . शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार, मिलिंद नार्वेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर

देताना मुख्यमंत्री बोलत होते. नव्या शैक्षणिक धोरणामुळे अभियांत्रिकीचे अभ्यासक्रम मराठीतून चालविण्याची मुभा देण्यात आली असून, या स्पर्धा परीक्षाही मराठीतून घेतल्यामुळे मराठी भाषक विद्यार्थ्यांना मदत होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**फडणवीस**

पारंपरिक ऊर्जा स्त्रोत मर्यादीत असल्यामुळे यापुढील काळात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांवरच भर द्यावा लागणार आहे. त्यामुळेच राज्यातल्या 18 जिल्ह्यांमधल्या आरोग्य केंद्रांचं सौरऊर्जीकरण केलं जात असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

यापैकी नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, बुलढाणा, गडचिरोली, नागपूर, लातूर आणि वर्धा या आठ जिल्ह्यातल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांचं सौरऊर्जीकरण पूर्ण झालं आहे. इतर दहा जिल्ह्यातले प्रकल्प लवकरच कार्यान्वित करणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**रक्तदान VC**

रक्तदानाबाबत असलेले गैरसमज मोठ्या प्रमाणात दूर झाल्याने अलीकडील काळामध्ये रक्तदात्यांची संख्या वाढली आहे. सध्या राज्यात 21 लाख रक्तपिशव्यांचे संकलन होत आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातून लगतच्या पाच राज्यांना मोठ्या प्रमाणात रक्तपुरवठा केला जात आहे. ऐकुया, या विषयी एक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून....

**भारतात रक्त संकलन व वितरणामध्ये अग्रस्थानी असलेल्या महाराष्ट्रात 400 च्या आसपास अत्याधुनिक रक्तपेढया आहेत. प्रत्येक वर्षी विविध उपक्रमांतून, ऐच्छिकदात्यांच्या माध्यमातून,विविध ठिकाणी होत असलेल्या सुमारे 40 हजार रक्त संकलन शिबिरांमधून वर्षाला एकून 21 लाख रक्त पिशव्यांचे संकलन केले जात आहे.संकलित केलेल्या रक्त पिशव्यांमधून प्लाजमा आरडीपी प्लेटलेट, होल ब्लड, पीसीव्ही, सिंगल डोनर प्लेटलेस् हे महत्त्वाचे घटक मिळतात, राज्यात वर्षाला बारा ते पंधरा लाख रक्त पिशव्यांना मागणी असते. आज महाराष्ट्रामध्ये देशाचा इतर राज्यांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात रक्त संचय होत असल्याने वितरणही तितक्याच सुलभपणे होत आहे.महाराष्ट्र राज्य आपली स्वतःची रक्ताची गरज पूर्ण करून इतरही राज्यातील रुग्णांना रक्त पुरवठा करत आहे. हे केवळ रक्तदान चळवळीत सहभागी असलेल्या रक्तदात्यांमुळेच शक्य झाले आहे. असं इंडियन ब्लडबँक असोसिएशनचे राज्य समन्वयक शशिकांत जगदाळे यांनी सांगितले.**

**पशुधन**

राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून सुरू होणारा पशुखाद्याचा पथदर्शी प्रकल्प पशुपालकांना आधार देणारा ठरेल, असा विश्वास जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल अहिल्यानगर जिल्ह्यातल्या लोणी खुर्द इथे व्यक्त केला. पशुसंवर्धन विभाग आणि राहाता कृषी उत्पन्न

बाजार समितीच्या वतीनं उभारण्यात येणाऱ्या पशुखाद्य प्रकल्पाचं भूमिपूजन विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

**ग्राहक हक्क दिन**

ग्राहकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देण्यासाठी तसंच त्यांची दिशाभूल होऊ नये म्हणून केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं ग्राहक व्यवहार मंत्री  प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे, जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त आयोजित एका वेबिनारला ते संबोधित करत होते. ग्राहकांचं केवळ संरक्षणच नव्हे तर ग्राहकांची समृद्धी हे देखील सरकारचं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले.
जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त, काल पुण्यात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने, स्वारगेट मेट्रो स्थानकात एका प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं होतं.
या प्रदर्शनातून ग्राहकाने कश्या प्रकारे जागरुक असणे आवश्यक आहे. तसंच आपल्या जागरुकतेमुळे दुसऱ्या एखाद्या नागरिकाची फसवणूक कशी वाचू शकते या विषयीची माहिती मिळते.
यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयातही काल विविध विभागांच्यावतीने ग्राहकांची जागृती करणारे प्रदर्शन लावण्यात आलं होते.

**तुकाराम-बीज**

आम्ही जातो आमच्या गावा आमचा राम राम घ्यावा असं सांगून सदेह वैकुंठ गमन करणाऱ्या संत तुकाराम महाराजांच्या 375 व्या बीज सोहळ्यासाठी आज देहू नगरी दुमदुमली आहे.       ऐकुया एक वृत्तांत -
संत तुकाराम महाराजांनी आपल्या भक्तीरसपूर्ण अभंगातून समाजाला परखड शब्दात मार्गदर्शन करत, उच्च आचार नीतीमूल्यांचं प्रतिपादन केलं.
**'देवासी अवतार, भक्तांसी संसार' असं सांगणारे तुकाराम महाराज यांनी अतिशय प्रतिकूल पद्धतीचे जीवन जगत, उच्च आचार मूल्य समाजापुढे ठेवली. वृक्षवल्ली आम्हा सोयरे म्हणून पर्यावरण विषयक जाणीव जागृती समाज मनात निर्माण केली.  मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास म्हणणारे तुकाराम महाराज नाठाळाच्या माथी काठी हाणण्याकरता जरा ही संकोचत नव्हते. आजच्या काळात उत्तम जीवन जगण्यासाठी संत तुकाराम महाराजांच्या गाथेचे केवळ पारायण न करता ती आचरणात अन्न अधिक जरुरी आहे आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून मेघना देशपांडे**

**ऊस उत्पादन कार्यशाळा**

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने, ऊस शेतीत नवी क्रांती होत असून कमी खर्चात अधिक उत्पादन देणारं हे संशोधन देशाच्या कृषी क्षेत्रात मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केला. वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन आणि ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती यांच्या वतीनं  आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते काल बोलत होते. या कार्यशाळेत राज्यातल्या 102 साखर कारखान्यांनी सहभाग घेतला आहे.

**वाळू-आराखडा**
राज्य मंत्रिमंडळासमोर या आठवड्यात सर्वसमावेशक वाळू धोरण मांडणार असल्याचं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नागपुरात सांगितलं. राज्यात लिलाव न झालेल्या तसंच ज्या ठिकाणी पर्यावरण विभागाची मंजुरी मिळाली आहे, अशा ठिकाणी वाळू घाट सुरू करण्याचा निर्णय हे नवीन वाळू धोरण मंजूर झाल्यानंतर घेतला जाणार असल्याचं ते म्हणाले. एम-सॅन्ड या योजनेत प्रत्येक जिल्ह्यात यंत्राद्वारे दगड बारीक करून वाळू तयार केली जाईल. या पर्यायी वाळूच्या उपलब्धतेमुळे नदीतल्या पारंपरिक वाळूची मागणी कमी होईल,असा दावा बावनकुळे यांनी केला.

**नामांतर**
कोल्हापुरातल्या शिवाजी विद्यापीठाचं नाव बदलून ते 'छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ' करावं या मागणीला कोल्हापुरातल्या तालीम, संस्था, संघटनांनी तीव्र विरोध केला आहे. शिवाजी विद्यापीठात काल पार पडलेल्या अधिसभेत नामांतराच्या विरोधात सिनेट सदस्यांनी देखील आक्रमक भूमिका घेतली. विद्यापीठाचं नामांतर झाल्यास विद्यापीठाचा उल्लेख लघुरुपात CSMU केला जाईल, त्याला आमचा विरोध असल्याचं स्थानिक संघटना आणि सिनेटचं म्हणणं आहे.

**सकपाळ-दौरा**
काँग्रेसचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पक्षाची सूत्रं हाती घेतल्यावर सिंधुदुर्ग जिल्ह्यातून कालपासून आपला महाराष्ट्र दौरा सुरु केला. इथले मंत्री आणि आमदार शिवराळ भाषा वापरत असल्याची टीका सकपाळ यांनी केली.

**बुडून मृत्यू**
चंद्रपूर जिल्ह्यात नागभीड इथं घोडाझरी प्रकल्पावर पर्यटनासाठी गेलेल्या पाच युवकांचा तलावात बुडून मृत्यू झाला. हे पाचही युवळ चिमूर तालुक्यातल्या साठगाव कोलारी इथले असून त्यापैकी चार जण एकाच कुटुंबातले आहेत.

**हवामान-पाऊस**
राज्यात बहुतांश ठिकाणी तापमानाचा पारा चढलेला असून विदर्भात येते दोन दिवस उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अकोला, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा केशरी तर वर्धा, नागपूर आणि अमरावती जिल्ह्यात पिवळा बावटा फडकवण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातल्या शाहूवाडी आणि आजरा तालुक्यात काल पावसानं जोरदार हजेरी लावली. उन्हाळ्यात बरसलेल्या या पाऊसधारांमुळे नागरिकांना उकाड्यापासून काही काळ दिलासा मिळाला.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**